महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/विवि-४/संकीर्ण/२०२२/ 5421 दिनांक : 21 NOV 2022

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या
अधिनस्त संस्था, पुणे विभाग, पुणे.

**विषय : महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा पूर्व परीक्षा- २०२२**
**परीक्षा आयोजनाकरिता संस्था (पदवी/पदविका) उपलब्ध करून देण्याबाबत.**

संदर्भ- १. शासन परिपक, सा.प्र.वि.क्र.मलाआ १०१२/प्र.क्र.९५/१२/आठ दि.११.०५.२०१२
२. शासन परिपत्रक, उच्च व तंशिक्षण विभाग, क्रं.संकीर्ण-११११/(प्र.क्र.९)१५/समन्वय, दि.२८ जानेवारी २०१५.
३. महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे पत्र क्र.एमटीएस-०४२२/सीआर-२५/२०२२/१३ दि.१६.११.२२
४. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचा दि.१८.११.२०२२ रोजीचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **शनिवार, दि.१७.१२.२०२२ रोजी महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा पूर्व परिक्षा २०२२** आयोजित करण्यात आली आहे. परिक्षेच्या सुरळीत आयोजनासाठी करावी लागणारी सर्व प्रकारची व्यवस्था लक्षात घेता या विभागातील पदवी/पदविका महाविद्यालयांची उपलब्धता दि.२९.११.२०२२ पर्यंत अंतीम करण्याबाबत संदर्भ पत्र क्र.०३ अन्वये निर्देश देण्यात आले आहे.

त्यास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पदवी/ पदविका महाविद्यालयांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मागणीनुसार शनिवार, दिनांक १७ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा पूर्व परिक्षा-२०२२ साठी आप-आपली संस्था (महाविद्यालय) उपलब्ध करून द्यावी. तसेच परिक्षेची सर्व प्रकारची व्यवस्था व पूर्वतयारी लक्षात घेता पदवी/ पदविका महाविद्यालयाची उपलब्धता दिनांक २९.११.२०२२ पर्यंत अंतिम होणे आवश्यक असल्याने **सर्व संस्थांनी आप-आपल्या संस्थेची माहिती सोबत दिलेल्या लिंकद्वरे गुगल फॉर्म मध्ये दि.२३.११.२०२२ रोजी सायं.०५ वाजे पर्यंत अचूक भरावी.**

तसेच आवश्यकता भासल्यास सदर दिवशी संस्थेला स्थानिक सुट्टी जाहीर करावी.

गुगल लिंक- https://forms.gle/6pANmtKD62ZLTJib6

सोबत- संदर्भिय पत्रे.

( डॉ. द.व्यं.जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.